# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ
# कोंकण भवन, नवी मुंबई -४०० ६१४.

**दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : ०२२ २७५७९४६३. Email ID : ic.konkan@maharashtra.gov.in**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल.**

**अपिल क्रमांक : केआर-२३६७/२०१६, सुनावणीचा दिनांक : १६/३ /२०१७**

श्री.सुदेश रोहरा, ...अपिलार्थी
३०१, गायत्री अपार्टमेंट,
बँक ऑफ बडोदा जवळ, नेहरु चौक,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, ...प्रतिनिधी
प्र.मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
तळ मजला, मुख्यालय, उल्हासनगर,
जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपिलीय प्राधिकारी, उप आयुक्त (मालमत्ता),
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
तळ मजला, मुख्यालय, उल्हासनगर,
जि.ठाणे ४२१ ००३.

**विवेचन**

| | |
|---|---|
| **माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक -** | **: २१/३/२०१६** |
| **जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक -** | **:----** |
| **प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक -** | **: ३/५/२०१६** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक -** | **:----** |
| **व्दितीय अपिल प्राप्त झाल्याचा दिनांक -** | **: २/६/२०१६** |

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती. विशाखा सावंत, मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(१) नुसार दिनांक २१.३.२०१६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून सुलभ शौचालयासंदर्भात एकूण आठ मुद्यांची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर विहीत मुदतीत सुनावणी घेतली नाही व आदेश पारीत केलेले नाहीत.

अपिलकर्ता यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे दिनांक २.६.२०१६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले. अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांना द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने नोटीस काढून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले.

**सुनावणीचा तपशील**

अपिलकर्ता सुनावणीची सुचना देवूनही गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस दिनांक ६.४.२०१६ रोजी कळविण्यात आले. दिनांक ६.४.२०१६ रोजी माहिती देण्यात आली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांनी पोहोच दिलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.
२. अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.
३. दि. ६.४.२०१६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रात एकूण किती पृष्ठे आहेत व त्यांचे शुल्क किती आहे याचा उल्लेख केला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने अभिलेख निरीक्षणाची संधी देऊन, अपिलार्थीस ५०० पृष्ठापर्यन्तची माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरवावी. त्यापुढील माहितीची पृष्ठे जन माहिती अधिकारी यांनी विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस पुरवावीत. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ मार्च, २०१७.

**विवेचन**

आयोगाच्या उपरोक्त आदेशान्वये अपीलार्थीस १५ दिवसात माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. तथापि तक्रारकर्तास आयोगाच्या आदेशानुसार माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८ नुसार दि.१७/६/२०१९, १३/८/२०१९ व २/१/२०२० रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली.

आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दिसून आले की, आयोगाच्या दि.१६/३/२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार दि.२१/३/२०१६ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून (सुलभ शौचालयासंदर्भात आठ मुद्यांची माहिती) या माहितीसंदर्भात तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर मनपा यांनी माहिती दिलेली नाही म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये शास्तीस पात्र असून त्यांचेवर रू.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. आयोगाच्या दि.१६/३/२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार दि.२१/३/२०१६ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून (सुलभ शौचालयासंदर्भात आठ मुद्यांची माहिती) या माहितीसंदर्भात तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती विशाखा सावंत, मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर मनपा यांनी माहिती दिलेली नाही म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये शास्तीस पात्र असून त्यांचेवर रू.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा (तक्रारकर्तास माहिती दिल्याचे पत्र, पोहोच पुराव्यासह) ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ८ डिसेंबर, २०२३.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती विशाखा सावंत, मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, उल्हासनगर मनपा
**- यांना प्रत** सहायक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१००३. **यांचेमार्फत रवाना.**

Comp-३